# पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी इतिवृत्त

**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स श्री पांडुरंग सहकारी साखर कारखाना लि, श्रीपूर, तालुका- माळशिरस, जिल्हा -सोलापूर, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित क्षमता विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता विस्तार ६,००० मे.टन प्रतिदिन वरुन १०,००० मे.टन प्रतिदिन पर्यंत, आसवणी प्रकल्प क्षमता ४५.० किलोलिटर प्रतिदिन वरुन ९०.० किलो लिटर प्रतिदिन पर्यंत (रेक्टीफाईड स्पिरिट/इ.एन.ए./इथेनॉल) आणि सहविद्युत निर्मिती प्रकल्प क्षमता - २२.० मेगावॅट वरुन ३४.० मेगावॅट क्षमतेपर्यंत संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतचा इतिवृतांत**

---

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स श्री पांडुरंग सहकारी साखर कारखाना लिमिटेड, श्रीपूर, तालुका- माळशिरस, जिल्हा -सोलापूर, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित क्षमता विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता विस्तार ६,००० मे.टनप्रतिदिन वरुन १०,००० मे.टन प्रतिदिन पर्यंत, आसवणी प्रकल्प क्षमता ४५.० किलो लिटर प्रतिदिन वरुन ९०.० किलो लिटर प्रतिदिन पर्यंत (रेक्टीफाईड स्पिरिट/इ.एन.ए./इथेनॉल) आणि सहविद्युत निर्मिती प्रकल्प क्षमता - २२.० मेगावॅट वरुन ३४.० मेगावॅट क्षमतेपर्यंत संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी वार-सोमवार, दिनांक ०२ ऑगस्ट, २०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती. भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयांच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित

अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-५७,व्दारा पत्र क्रं/बीओ.जेडी/पीएच/डब्लुपीसी/बी-२१०७२९-एफटीएस-०००८ दिनांक २९-०७-२०२१ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठित केलीः-

१) जिल्हादंडाधिकारी, सोलापूर किंवा त्यांचे प्रतिनिधी (अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) **-अध्यक्ष**

२) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे (महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी) **- सदस्य**

३) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर **-आयोजक**

श्री प्रशांत भोसले, प्रभारी, उप प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, सोलापूर तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की कोविडच्या पार्श्वभूमीमुळे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशांनुसार ही

प्रत्यक्ष जनसुनावणी (Physical Public Hearing) आयोजित करण्यात आलेली असून बैठकीच्या सत्रात १०० व्यक्तींना परवानगी देण्यात आलेली असून जेर उपस्थितांची संख्या जास्त असल्यास व्यक्तींना पुढील सत्रात बैठकीत संधी देण्यात येईल. सर्व उपस्थितांना जनसुनावणीत सहभागाची संधि देण्यात येईल असे सांगितले. त्यांनी उपस्थितांना कोविडच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या निर्देशांचे पालन करण्याची सूचना केली. त्यानुसार, प्रत्येक व्यक्तिचे शारीरीक तापमान तपासणे, सॅनिटायझरचा वापर सभागृहात प्रवेश करताना करण्यात आलेला आहे. बैठकीत प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवण्याची सूचना केली.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री. भारत वाघमारे, अपर जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री. नितीन शिंदे, प्रभारी प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, पुणे तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती,प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरणावर कार्यरत संस्था, व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित

दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

श्री. प्रशांत भोसले यांनी असे सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना प्रकल्प प्रवर्तक मेसर्स श्री पांडुरंग सहकारी साखर कारखाना लिमिटेड, श्रीपूर, तालुका- माळशिरस, जिल्हा - सोलापूर, महाराष्ट्र यांच्या ऊस गाळप क्षमता विस्तार ६०००.० मे.टन प्रतिदिन वरुन १०,०००.० मे.टन प्रतिदिन पर्यंत, आसवणी प्रकल्प क्षमता ४५.० किलोलिटर प्रतिदिन वरुन ९०.० किलोलिटर प्रतिदिन पर्यंत (रेक्टीफाईड स्पिरिट/इ.एन.ए./इथेनॉल) आणि सहविद्युत निर्मिती प्रकल्प क्षमता - २२.० मेगावॅट वरुन ३४.० मेगावॅट क्षमतेपर्यंतसंदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झालासदरहू प्रकल्प घोषित औद्योगिक . विभागाच्या परिसराबाहेर कार्यान्वित असून गॅझेट अधिसूचना एस.ओ.१९६० दिनांक १३ जून, २०१९ नुसार संवर्ग ब मध्ये मोडत असल्याने त्यासाठी जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे .प्रकल्प प्रवर्तकांनी

महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मुंबई यांना पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्याची परवानगी मागितली व सदरहू विभागाने दिनांक २८-१०-२०१८ रोजी त्यास मान्यता (अटी व शर्ती -Terms of Reference) देण्यात आली.

मा. जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या मान्यतेने सदरहू जनसुनावणी ही दिनांक ०८-०१-२०२१ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. मात्र ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुक आणि पंढरपूर विधानसभा पोटनिवडणुकीमुळे पुढे ढकलण्यात आली. नंतर, जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या मान्यतेने सदरहू जनसुनावणी ही दिनांक ०२-०८-२०२१ रोजी आयोजित करण्यात आली. त्यानुसार पर्यावरण अधिसुचनेनुसार अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक संचार व दैनिक तरुण भारत या वृत्तपत्रात दिनांक २८ जुलै, २०२१ रोजी पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना प्रकाशित करण्यात आलेली होती.

त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, विभागीय कार्यालय, पश्चिम-मध्य विभाग, न्यू, सेक्रेटरिएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर - ४४० ००१, मा .,जिल्हादंडाधिकारी कार्यालय,

सोलापूर, मा. .अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालय, सोलापूर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, सोलापूर, तेहसीलदार, तहसील कार्यालय-माळशिरस, जिल्हा -सोलापूर,गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माळशिरस, तालुका - माळशिरस,,जिल्हा -सोलापूर, ग्रामसेवक/सरपंच, ग्रामपंचायत, कार्यालय-, मौजे-श्रीपूर, महाळुंग, बोरगांव, माळखांबी, मीरे, तालुका - माळशिरस, जिल्हा -सोलापूर,पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई,प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे, उप प्रादेशिक अधिकारी, उप प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर, व मप्रनि मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते.

आयोजक यांनी असे सांगितले की स्थानिक मप्रनि मंडळ सोलापूर कार्यालयास ईमेलव्दारे श्री. धीरज दत्तात्रय जाधव राहणार-महाळुंग, तालुका -माळशिरस, जिल्हा - सोलापूर यांच्याकडून एक लेखी आक्षेप व सुनावणीस उपस्थित श्री. अशोक मारुती जाधव राहणार-महाळुंग, तालुका -माळशिरस, जिल्हा - सोलापूर यांच्याकडून एक लेखी आक्षेप तसेच प्रकल्पास पाठिंबा असलेले ०५ लेखी निवेदने प्राप्त झालेली आहेत. आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे कांही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात श्री .भोसले यांनी

पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. .अध्यक्षांना केली

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण केले. त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पास एकूण १५० कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे. सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प असून प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण व्यवस्थापन योजनांसाठी दरवर्षी १८५ लाख रुपये खर्च करण्यात येईल.

सादरीकरणानंतर पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांच्या काही आक्षेप, सूचना नोंदविण्याचे आवाहन केले.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक प्रकल्प / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना/सल्लागार दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

**१) श्री संजय पाठक, राहणार-मिरे, तालुका-माळशिरस जिल्हा-सोलापूरः-**

पूर्वी या प्रकल्पातून शेतक-यांना या कारखान्यातून शेतात वापरण्यासाठी कंपोस्ट दिले जायचे. तर आता स्पेंट वॉश ड्रायरमधून जे पोटॅश निघेल, ते कारखान्याच्या मार्फत शेतक-यांना पुरविण्यात येईल काय?

प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की या नविन तंत्रज्ञानामुळे आपणास मिळणारे पोटॅश हे दर्जेदार मिळणार आहे. ड्रायींग सिस्टमव्दारे आपण स्पेंट वॉशची जी पावडर करणार आहोत आणि आपली

जैविक खते मिसळून चांगल्या दर्जाचे खत आपण शेतक-यांना पूर्वीप्रमाणेच देणार आहोत.

२) **<u>श्री मिलिंद मधुकर कुलकर्णी, जेष्ठ नागरिक, राहणार- महाळुंग-श्रीपूर, तालुका-माळशिरस, जिल्हा-सोलापूरः-</u>**

प्रकल्पाचे विस्तारिकरण करण्यात येणार आहे. या विस्तारिकरणासाठी पाण्याचा वापर हा ब-याच मोठ्या प्रमाणात करण्यात येणार आहे. तरी वापरलेल्या पाण्याचा कशा प्रकारे निपटारा होणार आहे? याबाबत खुलासा व्हावा ही विनंती.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की सादरीकरणात दर्शविल्याप्रमाणे आपण साखर कारखान्याची गाळप क्षमता वाढविणार आहोत. आपण गाळप जास्त करणार आहोत. त्यातील ७०% पाण्याचा पुनर्वापर करण्यात येणार आहे. ते पाणी आपण आसवणी प्रकल्पात वापरणार आहोत. संपूर्ण महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यात आपण आपल्या कारखान्यात सर्वात प्रथम Air Cooled Condensor Technology वापरणार आहोत. जी जुन्या आसवणी प्रकल्पातही वापरत असून विस्तारित आसवणी प्रकल्पातही वापरत आहोत. त्यामुळे सुमारे ५-६ लाख लिटर्स पाणी आपल्याला कमी लागणार आहे. त्यामुळे पाण्याची बचत होणार आहे. सी.पि.यु. सयंत्रणेतून चांगले पाणी तयार होते, ते पाणी आपण भाडेतत्वावर घेतलेल्या शेती महामंडळाची शेतात ऊस पिकवण्यासाठी वापरत आहोत. त्यामुळे आपल्याला जादा पाणी लागणारच नाही, किंबहुना आपल्या पाण्याची बचतच होणार आहे. नविन पाणी आम्ही कुठलेही घेणार नाहीत.

३) **श्री प्रतापराव पाटील, राहणार-बोरगांव, तालुका-माळशिरस, जिल्हा-सोलापूरः-**

कारखाना सुरु झाला, त्यामुळे आमच्या भागातील विकास हा निश्चितच झालेला आहे. आमचेही कारखान्यास सहकार्य आहे. मात्र कारखान्यातून पूर्वी जी राख निघत होती व आता नविन आधुनिक तंत्रज्ञानामुळे राख निर्माण होईल, त्याच्या प्रमाणात (Quantity) किती बदल होईल? आता उत्पन्न होणा-या राखेचे प्रमाण किती कमी होईल?

प्रकल्प प्रवर्तकांनी मत मांडले की अतिशय चांगला प्रश्न विचारलेला आहे. आपण ड्रायर सिस्टिम टेक्नॉलॉजी वापरत आहोत. त्या सयंत्रणेत बॉयलरच्या चिमणीतून जो फ्ल्यु गॅस बाहेर जातो. तो सुमारे ४,९०,००० एम.क्युब एवढा निघत असतो. तो सगळा फ्ल्यु गॅस ड्रायरमध्ये आपण ड्राय पावडर करण्यासाठी वापरणार आहोत, त्याच्यासाठी वापरणार आहोत. उत्पन्न होणारी राखसुध्दा त्याच्यात वापरणार आहोत. राख आणि चुना योग्य प्रकारे एकत्रित करण्यात येईल. त्यामुळे बॉयलरमधील निघणारी राख आणि फ्ल्यु गॅसही कमी होणार आहे. त्यामुळे परिसरात होणारा राखेचा प्रादुर्भाव हा पूर्ण संपुष्टात येईल.

४) **श्री मदन पाटील,राहणार-बोरगांव, तालुका-माळशिरस, जिल्हा-सोलापूरः-**

आम्ही बोरगाव गावचे नागरिक ग्रामपंचायतीतर्फे आपले म्हणणे मांडत असतो. तरी पूर्वी प्रकल्पात कार्यरत असणारी सयंत्रणा व राखेचे प्रमाण आणि आता प्रस्तावित नविन आधुनिक सयंत्रणेमुळे कमी होणारे, राखेचे प्रमाण याबाबत माहिती देण्यात यावी, ते

पुढे म्हणाले की मी शेतीनिष्ठ शेतकरी असून मला राज्य सरकारचा पुरस्कार मिळालेला आहे. शेतीत केळी, डाळिंब, द्राक्षे यांच्या बागा आहेत. येथून दोन कि.मी. लांब विचार केला तर बोरगाव येते. पाणी कमतरता असेल, तर ऊसाऐवजी फळबागा करतो याबाबत प्रत्येक शेतकरी नियोजन करत असतो. तरी माहितीपत्रक उपलब्ध करुन देण्यात यावे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी आश्वासन दिले की माहितीपत्रक देण्यात येईल. तसेच प्रक़ल्प पर्यावरणविषयक अहवालामध्ये याची पुर्ण माहिती देण्यात आलेली आहे.

५) **<u>श्री अशोक मारुती जाधव, राहणार-महाळुंग, तालुका-माळशिरस, जिल्हा-सोलापूरः-</u>**

या कारखान्याच्याबाबत मी मागच्या वर्षी तक्रारी केलेल्या होत्या. आपल्या कारख़ान्याच्या चिमणीतून बाहेर पडणारी राखेमुळे माझे शेतीतील पीकांचे भरपूर नुकसान झालेले आहे. उप प्रादेशिक कार्यालयाने रात्री नमुने गोळा केलेले होते. मी प्रदूषण नियंत्रण मंडळ व कारखान्याला तक्रार दिलेली होती. आतापर्यत काहीही झालेले नाही.

आता आज जी जनसुनावणी बैठक आयोजित करण्यात आलेली आहे. त्याची पूर्व कल्पना ग्रामस्थांना दिलेली नाही. मला उडत उडत बातमी मिळाली, म्हणून मी येथे आलेलो आहे. विस्तारिकरणामुळे स्थानिकांना रोजगार मिळेल, याबाबत सहकार्य राहिल, पंण राखेचे नियोजन कसे केले आहे?

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आपली तक्रार उप प्रादेशिक कार्यालयास प्राप्त झालेली

होती. उप प्रादेशिक अधिकारी, सोलापूर यांनी याबाबत पहाणी क्रुन त्याचा अहवाल प्रादेशिक अधिकारी, पुणे यांना सादर करण्यात आलेला होता. व त्यास अनुसरुन संबधित कराखान्यास नोटीस पाठविण्यात आलेली होती. त्या अनुषंगाने कारखान्याने समर्पक व समाधानकारक उत्तरही त्यावेळी दिलेले आहे. प्रकल्पाच्या आधुनिक सयंत्रणेबाबत आपण आपल्या सूचना, आक्षेप येथे नोंदवू शकता. त्याचप्रमाणे आपण ईमेलव्दारेही आपण आपली तक्रार, आक्षेप नोंदवू शकता. त्याची नोंद घेण्यात येऊन जनसुनावणी बैठकीच्या इतिवृतान्तासोबत शासनास पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येईल. त्यांनी पुढे सांगितले की प्रस्तावित विस्तारिकरणामुळे संभाव्य पर्यावरण आघातांबाबत केलेल्या उपाययोजना व आपल्या सूचना , आक्षेप व त्यानुसार प्रकल्प प्रवर्तकांनी करण्याची कार्यवाही हाच उद्देश असतो. पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार प्रकल्प बाधित गावातील सर्व ग्रामपंचायतीस सर्व दस्तावेज - कार्यकारी सारांश अहवाल मराठी व इंग्रजी सर्व ग्रामपंचायतीस उपलब्ध करण्यात आलेला होता. त्याची पोचपावती स्थानिक उप प्रादेशिक कार्यालयात आहे. त्याचप्रमाणे आपणास त्याबाबतही काही आक्षेप असल्यास तो आताही आपण नोंदवू शकता.

सदस्य यांनी सांगितले की जनसुनावणीत आपल्या सूचना, आक्षेप हे नोंदविण्यात येतात. ही समिती कोणताही निर्णय घेत नाही. सर्व आक्षेप, सूचना बैठकीच्या इतिवृतान्तासोबत शासनास पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येतात. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत निर्णय घेत असते. यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे सांगितले जो बदल

उत्पादनप्रकिया व प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा यात करणार आहेत, त्याची माहिती उपलब्ध् करुन देण्याची त्यांना सूचना केली.

यावेळी प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की आपण येथे नोंदविलेल्या आक्षेपामध्ये आम्ही जुनेच तंत्रज्ञान वापरत आहोत असे आपले म्हणणे आहे. या प्रकल्पामध्ये नविन बॉयलर बसविणयात येणार आहे, यामध्ये ईएसपी ही अत्याधुनिक सयंत्रणा वापरणार आहोत. यामुळे हवेचे प्रदूषण होणार नाही. तसेच सद्या अस्तित्वात असलेल्या बॉयलरच्या वेट स्क्रबर व ईएसपी यांची देखभाल दुरुस्तीचे काम उत्तमरित्या करण्यात येईल. सदर प्रकल्पामध्ये नविन आसवणी Air Cooled Condensor Technology वापरणार आहोत. पाच कोटी रुपये आपण त्यासाठी खर्च करणार आहोत. त्यामुळे आसवणी प्रकल्पाला लागणा-या पाण्यामध्ये 3-4 लाख लिटर्स पाण्याची बचत होणार आहे. त्याचप्रमाणे Dryer Technology जी आता सर्वात जास्त यशस्वी होणारी आहे. इन्सिनरेशन बॉयलरमध्ये स्पेंट वॉश जाळला जातो. मात्र येथे स्पेंट वॉश घट्ट करण्यात येतो. त्यामुळे या प्रकल्पामधुन कोणत्याही प्रकारचे प्रदूषण होत नाही हा प्रकल्प पुर्णतः झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प आहे.

६) **<u>श्री सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, अध्यक्ष, धरित्री पर्यावरण परिरक्षणा संस्था, जिल्हा-नालगोंडा, तेलंगणा राज्यः-</u>**

त्यांनी सूचना/आक्षेप मराठीत सांगण्याचा प्रयत्न केला. श्री सुनंदा रेड्डी यांनी सांगितले की ते भारतातील सर्वात प्रथम असे पर्यावरणवादी आहेत की जो औद्योगिक विकासाचा आग्रह करत

असतो. पर्यावरणवादी हे उद्योगांना विरोध करतात. पण मी नेहमी उद्योगविकासाचे समर्थन करतो. त्यांनी प्रकल्प विस्तारिकरण सुरु करण्याबद्दल प्रकल्प प्रवर्तकांचे अभिनंदन केले.त्यांनी सांगितले की भारतात १८-३५ वयातील ४० कोटी तरुण रोजगारापासून वंचित आहेत. त्यांनी सांगितले की पर्यावरण संरक्षण आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने ते काही सूचना देऊ इच्छितात,

त्यांनी सांगितले की पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघाचे पाणी,हवा, जमिन यांचे आधारभूत सर्वेषण केलेले आहे. ते चांगले केलेले आहे. माझी विनंती आहे की कृपया प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघातील जनतेची आरोग्याची सद्यस्थिती, पीक उत्पादनाची सद्यस्थिती व भूगर्भातील पाण्याची सद्यस्थिती याचा अहवाल तयार करण्याची सूचना केली. पर्यावरण समतोल अभ्यासासाठी त्याचा उपयोग होईल. त्याचप्रमाणे पावसाचे पाणी वाचवावे. हरित पट्टा विकसित करताना औषधी वनस्पतींची लागवड करावी.

त्यांनी पुढे सांगितले की प्रकल्पात रोजगाराची संधि देताना स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात यावे. त्याचप्रमाणे स्थानिक युवक युवतींसाठी कौशल्यविकास कार्यक्रम हाती घेण्यात यावा. त्याचप्रमाणे ठिबक सिंचन प्रणाली येथे विकसित करण्यात यावी.श्री रेड्डी यांनी सांगितले की ते त्यांचा सूचना लेखी स्वरुपात देत आहेत.

७) **श्री एच. मधुबाबू,अध्यक्ष, रुरल एन्हॉयरमेंट एज्युकेशन एन्ड हेल्थ अवरनेस सोसायटी,मुशीराबाद, हैद्राबादः-**

मी लेखी स्वरुपात सूचना पाठविलेल्या आहेत. प्रकल्पास पाठिंबा. त्यावेळी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिति यांनी त्यांचे निवेदन लेखी स्वरुपात देण्याची सूचना केली.

सदस्य, यांनी उपस्थितांना त्यांचे काही प्रश्न असल्यास ते विचारण्याचे आवाहन केले. त्याचप्रमाणे लेखी सूचना असल्यास त्या आयोजकांनी देण्याची सूचना केली. तो सर्व दस्तावेज शासनास पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येतील.

८) **श्री प्रकाश भालचंद्र केसकर,स्थानिक रहिवाशी, महाळुंग -श्रीपूर, तालुका-माळशिरस, जिल्हा-सोलापूर,**

त्यांनी कारखान्याच्या माध्यमातून येथील परिसराचा विकास होतो, म्हणून सर्व कारखाना व्यवस्थापनाचे अभिनंदन केले. मात्र विकासाबरोबर शासनाचा काही फायदा होणार आहे काय?

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की अतिशय योग्य प्रश्न विचारण्यात आलेला आहे. ही योजना शासनाचीच आहे. इथेनॉल ब्लेडिंग प्रकल्प केंद्र शासनाने जाहिर केलेला आहे. आपल्याला जितकी साखर आवश्यक आहे, त्याच्या दुप्पट साखरेचे उत्पादन होत आहे. त्यामुळे साखर कारखानदारी ही अडचणीत आहे. त्यामुळे केंद्र शासनाने इथेनॉल ब्लेडिंग प्रकल्पांतर्गत २०२५ पर्यंत २०% प्रत्यक्ष ऊसाचा रसच इथेनॉलसाठी वापरण्यात येणार आहे. शासनाला जे इथेनॉल आयात करावे लागते, पेट्रोल डिझेलसाठी जे पैसे खर्च करावे लागतात, ते भरुन निघतील आणि आपला देश हा इथेनॉलसाठी स्वयंपूर्ण होईल. त्यामुळे सर्वजण मिळून २०%

अल्कोहोलसाठी वापरणार आहोत. त्याचा अतिरिक्त फायदा कारखान्यास मिळून शेतक-यांना त्यांच्या ऊसपीकासाठी चांगला भाव देता येईल.

अध्येक्ष आणि सदस्य यांनी उपस्थितांना त्यांचे आक्षेप, सूचना देण्याचे आवाहन केले. सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी काही सूचना खालीलप्रमाणे केल्याः-

अ) जो ईआयए सादर करण्यात आलेला आहे, त्यात ईव्हॅपरेशन वापरणार होतो. नंतर बायो कंपोस्टींग करणार होतो. आता प्रस्ताव बदलेला आहे. आता पावडर रुपात करणार आहे. त्यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की कंपोस्टींग चालू ठेवणार आहोत. नंतर ते ड्रायर करणार आहेत.

ब) जी ड्रायर करण्याची पध्दत आहे, ती सर्वांना कळणे महत्वाचे आहे. त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की ईआयए जुने दिसते, तरी नविन तंत्रज्ञान आल्याने आम्ही ती प्रकल्पात कार्यान्वित करत आहोत.

क) नविन तंत्रज्ञानाचा उल्लेख सादरीकरणात व ईआएमध्ये करणे आवश्यक आहे. तो करण्यात यावा,

ड) शेतक-यांचा महत्वाचा मुद्दा आहे की राखेची विल्हेवाट कशी लावणार आहात, याबाबत ऊहापोह करुनच, अधोरिखीत करुनच अहवाल शासनास सादर करण्यात यावा,

आ) प्रकल्पात काही ठिकाणी ध्वनीची पातळी जास्त आढळते. उदा. कॉम्प्रेसरस, टर्बाईन, वेअरहाऊस ठिकाणी. त्याबाबत आपण उपाययोजना करून दक्षता घेण्यात यावी.

सदस्य यांनी पुन्हा सूचना, प्रश्न विचारण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताही प्रतिसाद नव्हता. त्यांनी अध्यक्षांना दोन शब्द बोलण्याची विनंती केली.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीचा ऊहापोह करताना सांगितले कीआजआपण प्रकल्प प्रवर्तक मेसर्स श्री पांडुरंग सहकारी साखर कारखाना लिमिटेड, श्रीपूर, तालुका- उत्तर माळशिरस, जिल्हा -सोलापूर, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित क्षमता विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता विस्तार ६,००० ०.मे.टनप्रतिदिन वरुन१०,००० ०. मे.टनप्रतिदिन पर्यंत, आसावणी प्रकल्प क्षमता ४५.० किलोलिटर प्रतिदिन वरुन ९०.० किलोलिटर प्रतिदिन पर्यंत (रेक्टीफाईड स्पिरिट/इ.एन.ए./इथेनॉल) आणि सहविद्युत निर्मिती प्रकल्प क्षमता - २२.० मेगावॅट वरुन ३४.० मेगावॅट क्षमतेपर्यंत संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीसाठी उपस्थित होतो. अतिशय चांगले मुद्दे उपस्थितांकडून सांगण्यात आले. त्याचप्रमाणे सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी पर्यावरण सल्लागार यांना काही सूचना केलेल्या आहेत. त्याप्रमाणे पर्यावरण सल्लागार यांनी अहवालात नोंद घ्यावयाची आहे. येथे काही निवेदने आलेली आहेत. त्याची नोंद घेण्यात यावी व इतिवृतान्तासोबत

महाराष्ट्र शासनास सादर करण्यात यावीत. त्यांनी सर्वांचे आभार मानून जनसुनावणी ही संपन्न् झाल्याचे जाहिर केले

अध्यक्षांचे आभार मानून बैठक संस्थगित करण्यात. आली.

सोबत वरिल ०२ आक्षेप व प्राप्त झालेल्या ०५ पाठिंबा असलेले पत्रे/सूचना जोडण्यात येत आहेत.

| | |
|---|---|
| **(प्रशांत भोसले),** | **(नितीन शिंदे) ,** |
| आयोजक, | सदस्य, |
| पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिति | पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती |
| तथा | तथा |
| प्रभारी, उप प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंड ळ, सोलापूर | प्रभारी प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, पुणे |

**(भारत वाघमारे),**

**अध्यक्ष**

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती

तथा

अपर जिल्हादंडाधिकारी, सोलापूर

जिल्हा- सोलापूर